वेदमुर्ति हरभट पुरोहित जोसी ता। मार
मोरेश्वरभट जोसी ता। मार
सिवभट जोसी ता। मार
अंताजी मोरेदेव देशकुलकर्णी ता। वेलवंडी खोरे
यसपाटील बेंडकास खोत मौजे झलवडी
मल्हार दताजी कुलकर्णी प्रो पुणें

बाबाजी आढलराव देशमुख ता। मार
कृष्णाजी नाईक व नाईक देशमुख ता। गुंजण मावल
लखमोजी नाईक व यसाजी नाईक डोहर देशमुख ता। मजकूर
सोनजी नाईक काकडे मोकदम मौजे बाबुर्डी ता। पारनेर प्रांत जुनर

सदरहु मज्यालसी व समस्त गोत मिलोन महजर केला ऐसा जे आपाजी बीन मलजी नाईक व विठोजी बीन गोरखोजी नाईक निगडे देशमुख पा। सिरवल हे उभयता दोघेजण भांडत होते ऐसे जे

अपाजी बी। मलजी नाईक निगडे यानी लेहून दिल्ही तकरीर ऐषि जे आपले वडिल घर आपला मानपान टिला विडा वडिलपणाचा भोगवठा जमीन चावर १ व होन पांच आहेत असे असे आपले असोत विठोजी बी। गोरखोजी नाईक धाकटे घरचा असोन बले च वडिल-पणाचा मान खातात तरि ये गोष्टीचा आपला निवाडा केला पाहिजे

विठोजी बी। गोरखोजी नाईक निगडे यानी तकरीर केली ऐसि जे आपले धाकटे घर होय परंतु आपले बाप मेले तेसमई राजश्री रामाजीपंत देशकुलकर्णी यांचे हाती दिल्हे परतु कारभार केला नाही आपला बाप पडिला त्या उपरी वडिलपणाचा कारभार केला असे मानपान टिला विडा व येक चावर जमीन व पाच होन आपण खादले असेती ऐसी तकरीर केली